


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १०४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२६ नोव्हेंबर २०२४


## राज्याची सूत्रं पुन्हा देवेंद्र फडणवीसांच्या हाती?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत महायुतीने जोरदार मुसंडी मारली आहे. आता निवडणुकीच्या निकालानंतर सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अशात महायुतीमधून भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपाच्या केंद्रीय नेतृत्त्वाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मंजूरी दिली असून, शिवसेना आणि राष्ट्रवादीनेही या निर्णयला होकार दिला आहे. भाजपामधल्या दोन उच्चपदस्थ नेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार इंडियन एक्स्प्रेसने याबाबत वृत्त दिले आहे. याचबरोबर एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संध्याकाळी दिल्लीत शिंदे, फडणवीस आणि पवार यांच्यासमवेत



सत्तावाटपाचा तपशील आणि मंत्रिमंडळ रचना यावर चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली असून त्यानंतर घोषणा अपेक्षित आहे.

**कोणत्या पक्षाचे किती मंत्री?**

शिवसेनेला सुमारे १२ मंत्रीपदे मि ळण्याची शक्यता असून, यामध्ये काही महत्त्वाच्या खात्यांचाही समावेश आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीलाही जवळपास १० मंत्रिपदे मिळणार आहेत. १३२ आमदार असलेल्या भाजपाच्या वाट्याला २१ मंत्रीपदे येण्याची शक्यता आहे. गृह, अर्थ, नागरी विकास आणि महसूल ही प्रमुख चार खाती भाजपा आपल्याकडे ठेवण्यास उत्सुक आहे. भाजपा गृह आणि अर्थ खात्यासाठी आग्रह धरू शकते, असे भाजपच्या अंतर्गत सूत्रांचे म्हणणे आहे.

**महायुती सुसाट...**

राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले.

त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालात महायुतीने बाजी म ारत २३० जागांवर विजय मिळवला. याम ध्ये भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५७ जागांवर बाजी मारली. महायुतीतून सर्वात कमी जागा लढवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही ४१ जागांवर विजय मिळवला.

**महाविकास आघाडीचा धुव्वा..**

दुसरीकडे सर्वत्र महाविकास आघाडीची सत्ता येणार अशी चर्चा असताना त्यांचा सुपडा साफ झाला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघ्या ४७ जागा आल्या. यामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २०, काँग्रेसने १९, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाने १०, समाजवादी पक्षाने २ व शेतकरी कामगार पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (एम) ने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला.

## पारनेरसाठी काय लागेल ते सांगा : अजित पवार

### सुजित झावरेंसह सर्वांना न्याय देणार !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर मतदासंघातील जनतेने मतदानातुन विकासाला प्राधान्य दिले आहे. येथील प्रलंबित प्रश्न मार्गी लावत विकास कामांना मोठा निधी राज्य सरकार मार्फत दिला जाईल.

पारनेरकरांनो आता काय लागेल ते सांगा असे आश्वासन देत. या निवडणुकीत सुजित झावरे पाटील यांचेसह सर्वांची अतिशय भुमिका म हत्त्वपूर्ण ठरली आसुन त्यांचे राजकीय पुनर्वसन लवकरच करणार आहोत असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. मुंबई येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज आमदार काशिनाथ दाते सर व तालुक्यातील महायुतीतील पदधिका-यांनी भेट घेतली त्यावेळी ते



> राजकारणातील अनुभव माझ्यापाशी राजकारणातील विविध पदांचा अनुभव माझ्या पाठीशी आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विकासाचे व्हीजन घेत मतदासंघात काम करणार आहे. आता केंद्रात व राज्यात दोन्ही ठिकाणी सत्ताकेंद्र आसल्याने केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करणार आहे.
>
> **-- काशिनाथ दाते, आमदार पारनेर तालुका**

बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, माजी सभापती गणेश शेळके, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, भाजपा नेते वसंत चेडे, सुभाष दुधाडे, सरपंच मनोज मुंगसे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पारनेर- अहिल्यानगर मतदासंघातील महायुतीतील सर्वच पदधिका-यांनी आपणच उमेदवार आहोत अश्या पद्धतीने निवडणुक हातात घेत प्रचार यंत्रणा हातात घेतली यामुळे आपण विजयापर्यंत पोहचलो. आमदार दाते यांना सहकार्य करणा-या सर्वच सहका-यांना सत्तेच्या माध्यमातून निश्चित न्याय देणार आहे.

## निवडणूक रणधुमाळी संपताच शेतकऱ्यांना पहिला दणका

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी संपताच कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील दूधसंघांनी गायीच्या दूध खरेदी दरात प्रतीलिटर तीन रुपयांनी कपात केली आहे. या निर्णयाचा दूध उत्पादकांना मोठा फटका बसणार आहे.

राज्यात गायीच्या दुधाची खरेदी दर २३ ते २५ रुपये प्रतिलिटरपर्यंत खाली आले होते. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गायीच्या दूधाला अत्यल्प दर मिळू लागल्यामुळे प्रामुख्याने नगर जिल्ह्यातील दूध उत्पादकांनी आंदोलनाचा मार्ग स्विकारला होता. महिनाभर चाललेल्या या आंदोलनानंतर पशूसंवर्धन व दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे – पाटील यांनी शेतकरी असंतोषाची दखल घेऊन गायीच्या दुधाची खरेदी ३० रुपये दराने करण्याची घोषणा केली होती.

३० रुपये दराने दूधसंघानी खरेदी करायची आणि प्रतिलिटर सात रुपये अनुदान राज्य सरकारने द्यायचे, असा ३७ रुपये प्रतिलिटरचा दर ठरविण्यात आला होता. प्रत्यक्षात कोल्हापूरात गायीच्या दुधाची खरेदी ३३ रुपयांनी होत होती, सात रुपयांचे अनुदान, असे एकूण



प्रतिलिटर ४० रुपयांचा दर दूध उत्पादकांनी मिळत होता.

पण, राज्यातील अन्य दूधसंघ ३० रुपयांनी दूध खरेदी करीत होते. बाजारात पिशवी बंद दूधासह अन्य दुग्धजन्य पदार्थांच्या दराच्या स्पर्धेत कोल्हापूर आणि सांगलीतील दूधसंघांचा टिकाव लागला नाही. या काळात दूध भुकटीचे दरही पडल्यामुळे ३३ रुपये प्रतिलिटर दराने दूध खरेदी शक्य होत नव्हती.

गोकूळ सारखे मोठे दूधसंघ बाजारातील स्पर्धेत कसेबसे टिकून राहिले, पण, लहान दूधसंघांना वाढता तोटा सहन होईना. त्यामुळे कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील दूधसंघांनी गायीच्या दूधखरेदी दरात तीन रुपयांची कपात केली आहे. आता प्रतिलिटर ३० रुपये दर आणि सात रुपयांचे राज्य सरकारते अनुदान, असा प्रतिलिटर ३७ रुपयांचा दर दूध उत्पादकांना मिळणार आहे. यापूर्वी ४० रुपये दर मिळत होता.

कोल्हापूर, सांगली जिल्ह्यात सहकारी दूधसंघांची संख्या मोठी असल्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दूध खरेदी दरात कपात करणे त्यांना राजकीय दृष्टीने अडचणीचे होते. त्यामुळे निवडणुकीची रणधुमाळी संपताच तातडीने गायीच्या दूध खरेदी दरात कपात करण्यात आली आहे.

**दूध उत्पादनात वाढ झाली !**

सध्या ओल्या आणि सुक्या चाऱ्याची उपलब्धता चांगली आहे. त्यामुळे दूध उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागणी कमी आणि पुरवठा जास्त, अशी स्थिती आहे.

राज्यातील अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत कोल्हापुरात खरेदी दर जास्त होता. त्याम ुळे बाजारात अन्य दूधसंघांच्या स्पर्धेत उतरताना कोल्हापूर जिल्ह्यातील लहान दूध संघांची आर्थिक कोंडी होत होती. त्याम ुळे दूध खरेदी दरात तीन रुपयांनी कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती नवी दिल्ली येथील नॅशनल डेअरी असोसिएशनचे संचालक डॉ. चेतन नरके यांनी दिली.

**दूध व्यवसाय अडचणीत येण्याची चिन्हे**

कोल्हापूर जिल्ह्यात गायीच्या दूध खरेदी दरात कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील अन्य दूधसंघ असेच निर्णय घेण्याची शक्यता आहे. विधानसभेची निवडणूक संपताच शेतकऱ्यांना बसलेला हा पहिला फटका आहे. एकीकडे दूध उत्पादनाचा खर्च वाढत आहे, दुसरीकडे खरेदी दर कमी होत आहे. राज्यातील दूध व्यवसाय अडचणीत येण्याची चिन्हे आहेत, असे मत अखिल किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी दिली.

## आदित्य ठाकरे यांच्यावर मोठी जबाबदारी ! ठाकरे गटाच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५, डोंबिवली (ठाणे) :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३० जागांवर मोठा विजय मिळवत सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागले. या पराभवानंतर महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे गट) संघटनात्मक बदल करत आहे.शिवसेना (ठाकरे गट) ने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये आदित्य ठाकरे यांना विधिमंडळ गटनेतेपदी नेमून पक्षातील त्यांची भूमिका अधिक मजबूत केली आहे. याशिवाय भास्कर जाधव यांची गटनेतेपदी, तर सुनील प्रभू यांची प्रतोद म्हणून निवड करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत नवनिर्वाचित आमदारांची उपस्थिती होती. महायुतीच्या विजयात भाजपने १३२, शिंदे गटाने ५७, आणि अजित पवार गटाने ४१ जागा जिंकल्या. महाविकास आघाडीत काँग्रेसला १६, ठाकरे गटाला २०, आणि शरद पवार गटाला १० जागांवर समाधान मानावे लागले. या नव्या नेमणुकीमुळे ठाकरे गटातील जबाबदाऱ्या स्पष्ट झाल्या आहेत. विधिमंडळातील निर्णयांसाठी आदित्य ठाकरे यांचा शब्द अंतिम म ानला जाणार आहे. भास्कर जाधव पक्षाच्या धोरणात्मक निर्णयांत महत्वाची भूमिका बजावतील, तर सुनील प्रभू यांच्या सहीनेच पक्षाचे अधिकृत निर्णय घेतले जातील. या बदलांमुळे ठाकरे गट आगामी राजकीय आव्हानांचा सामना करण्यासाठी अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## आठ महिन्यांच्या वाघाचा मृतदेह आढळल्याने खळबळ



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, चंद्रपूर :** मध्यचांदा वनविभागाचे चिवंडा वनपरिक्षेत्रात कक्ष क्र.१३८ मध्ये वाघाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. मृत वाघ मादी असून तिचे वय सात ते आठ महिने असल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे. वाघिणीच्या शरीरावर ओरखडल्याचे निशाण आढळले आहेत. मृतक वाघिणीचे सर्व अवयव शाबूत आहेत. प्रौढ नर वाघाचे लढाईत या सात ते आठ महिन्यांच्या मादीला मारल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे. पुढील तपास उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग श्वेता बोड्डू, सहाय्यक वनसंरक्षक शेंडगे यांचा मार्गदर्शनात वनपरीक्षेत्र अधिकारी एस. व्ही. मुरकुटे करीत आहे. शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे खरे कारण पुढे येणार आहे.

## खळबळजनक ! राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षांवर प्राणघातक हल्ला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२५, बुलढाणा :** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मेहकर येथील दोन गटातील संघर्षाची घटना ताजी असतानाच आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) नेत्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे.

यामुळे बुलढाणा विधानसभा मतदारसंघाच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सुनील कोल्हे असे गंभीर जखमी पदाधिकाऱ्याचे नाव असून ते राष्ट्रवादी (शरद पवार गट)चे मोताळा तालुका अध्यक्ष आहेत. सोमवारी सायंकाळी सात वाजताच्या आसपास हा हल्ला करण्यात आला. मोताळा तालुक्यातील तालखेड ते तालखेड फाटा दरम्यान ही घटना घडली. गंभीर जखमी तालुकाध्यक्ष सुनील कोल्हे यांना मोताळा येथे प्राथमिक उपचार केल्यानंतर बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय मध्ये उपचारासाठी भरती करण्यात आले आहे. त्यांचा डावा हात आणि डावा पाय 'फ्रॅक्चर' झाल्याची माहिती आहे.

मोताळा तालुक्यातील तालखेड आणि तालखेड फाट्याच्या मध्ये हा हल्ला झाला. हल्लेखोर तोंडावर रूमाल बांधून होते. दोन वेगवेगळ्या बाईकवरून आलेल्या चार जणांनी रॉडने कोल्हे यांच्यावर हल्ला चढविला. यात सुनील कोल्हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांचा डावा पाय आणि डावा हात फ्रॅक्चर झाला असल्याची माहिती आहे. त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात भर्ती करण्यात आले आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या तथा नुकतेच पार पडलेल्या बुलढाणा विधानसभेच्या निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवार जयश्री शेळके या जिल्हा रुग्णालयात दाखल झाल्या. महाविकास आघाडीचे अन्य नेते, पदाधिकारी देखील रुग्णालयात दाखल झाले. जयश्री शेळके यांनी पोलिसांनी अज्ञात हल्लेखोरांवर कडक कारवाईची मागणी केली आहे.

महाविकास आघाडीचे ज्यांनी प्राणपणाने काम केले अशा लोकांवर प्राण घातक हल्ले केले जात आहे निकालाच्या दिवसापासून महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना धमकावण्याचे प्रकार सुरु असल्याचा आरोप केला आहे. जिल्हा पोलीस प्रशासनाने अशा हल्लेखोरांना शोधून त्यांच्यावर तात्काळ कठोरात कठोर कारवाई केली पाहिजे. बुलढाण्याचा बिहार करण्याचा प्रयत्न काही लोकांकडून सुरू आहे.जिल्हा पोलिस अधीक्षकांनी या प्रकरणाला गांभीर्याने घेण्याची मागणी जयश्रीताई यांनी केली आहे. दरम्यान, कोल्हे यांना पाहण्यासाठी अनेकांनी जिल्हा रुग्णालयाकडे धाव घेतली.

## संपादकीय



### महाराष्ट्राचे भाग्यविधाते

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज पुण्यतिथी. आजच्याच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १९८४ रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी यशवंतराव चव्हाण यांचे निधन झाले. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्री पदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हमात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे.


**यशवंतराव चव्हाण यांना भावपूर्ण आदरांजली.**

# संविधान; भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आज २६ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७५ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान.

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक मालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा.

२६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन मेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून




समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला.

संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# विवाह संस्काराचा इव्हेन्ट बनतो आहे का ?

तुळशी विवाह लागले की लगीनसराई सुरु होते. यंदाही विवाहांना सुरुवात झाली आहे. साड्यांच्या दुकानात गर्दी दिसू लागली आहे. घरी लग्नपत्रिका येऊ लागल्या आहेत. व्हाट्सएपच्या स्टेटसना निमंत्रणाचे इमेजेस आणि व्हिडीओ दिसू लागले आहेत. प्रतिदिन कुठेनाकुठे बेंडबाजा किंवा डीजेचे आवाज कानी पडू लागले आहेत. हळदी आणि विवाहाची गाणी वाजू लागली आहेत. विवाह हा एक धार्मिक संस्कार आहेत ज्याचे जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे त्यामुळे त्या विधीतील धार्मिकता जपणे अत्यंत महत्वाचे आहे, गेल्या काही वर्षांत मात्र या संस्कारात धार्मिक बाबींना दुय्यम स्थान दिले जाऊन अवडंबराला अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. अनेक अनिष्ट बाबींचा यात समावेश होऊ लागला आहे. ज्यामुळे विवाहसुद्धा एक इव्हेन्ट बनू लागला आहे.

हिंदू धर्मात १६ संस्कारांपैकी पाणिग्रहण म्हणजेच विवाह संस्काराला अनन्यसाधारण महत्व आहे. ब्रह्मचर्याश्रमांतून गृहस्थाश्रमाला सुरुवात करण्यापूर्वी जो संस्कार केला जात असे त्यालाच पूर्वी विवाह संस्कार म्हटले जात असे. आजही गृहस्थाश्रमाला म्हणजेच संसाराला सुरुवात करण्यातील आरंभीचा टप्पा म्हणून विवाह संस्काराचे महत्व अबाधित आहे. देव, अग्नी आणि ब्राह्मण यांच्या साक्षीने हा विवाह संस्कार पार पडतो. विवाह संस्कारामध्ये श्री गणेश पूजन, सीमांतपूजन, मधुपर्कपूजन, गौरीहरपूजन, कन्यादान, मंगळसूत्र बंधन, अक्षतारोपण, मंगलाष्टके, विवाह होम, पाणिग्रहण, लाजाहोम, सप्तपदी, गर्भाधान असे अनेक विधी असतात. या प्रत्येक विधीच्या वेळी म्हटले जाणारे मंत्र, केलया जाणाऱ्या कृती यामागे ऋषीमुनींचा संकल्प कार्यरत असतो, त्यामुळे या विधी भावपूर्ण होणे अत्यंत महत्वाचे असते. विवाह संस्कार म्हणजे उभयतांना केवळ सहचर्य करण्याची अनुमती देणारा संस्कार नसून भावी जीवनात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची सांगड घालण्याची शिकवण देणारा संस्कार आहे. विवाहसंस्कारात नियोजित विधींना अधिक महत्व देण्यात आले आहे. सध्याच्या घडीला विवाहातील धार्मिक विधींपेक्षा अन्य गोष्टींना आणि कृत्रिम अवडंबराला अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. विवाह संस्कारात अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव झाला आहे, ज्यामुळे विवाहातील मुख्य विधींनाच बगल दिली जात आहे. विवाहासारख्या धार्मिक कार्यक्रमाचाही इव्हेन्ट होऊ लागला आहे, ज्यामुळे त्यातील सात्विकताच लोप पावू लागली आहे.

विवाह जुळवण्यासाठी हुंडा देणे आणि घेणे दोन्हीही भारतीय दंडविधानानुसार गंभीर गुन्हे आहेत. तरीही देशातील अनेक भागांत आजही हुंडा दिला आणि घेतला जात आहे. या हुंड्याच्या लोभामुळे दरवर्षी कितीतरी नववधूंचा छळ केला जातो. त्यापैकी कितीतरी जणी या छळाला कंटाळून आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग स्वीकारतात. व्हाट्स अप आणि टेलिग्रामच्या दुनियेतेतही आज महागड्या लग्नपत्रिका छापल्या जातात. लग्न पार पडल्यानंतर खरेतर पत्रिकेला काहीच महत्व उरत नाही, तरीही केवळ आपली पत दाखवण्यासाठी काही ठिकाणी महागड्या पत्रिका छापल्या जातात. विवाहाचे बॅनर्स आणि होर्डिंग्स लावण्याची पद्धत गेल्या काही वर्षांपासून रूढ होत चालली असून यावरही अवास्तव खर्च केला जात आहे. विवाहासाठी निश्चित केलेल्या मुहूर्तावर विवाह लागणे, अत्यंत महत्वाचे आहे, पुरोहितांकडून मुहूर्ताच्या वेळी वधू-वरांना आशीर्वाद देण्यासाठी देवतांना उपस्थित राहण्यास आवाहन केले जात असल्याने मुहूर्ताला देवता सूक्ष्मरूपाने येतात, असा लोकांचा समज आहे. त्यामुळे पूर्वी मुहूर्तावर विवाह लागण्यासाठी आधीपासूनच सर्व सिद्धता केली जात असे. आजमितीला विवाहाच्या मुहूर्तापेक्षा जवळच्या नातेवाईकांची उपस्थिती आणि वधू-वरांचा मेक अप यांना अधिक महत्व दिले जाते. त्यासाठी विवाह रोखून धरला जातो. अनेक जण लग्न लागल्यानंतर स्वागत समारंभाची आणि भोजनाची वेळ पाळून विवाहाला उपस्थित राहतात. पूर्वी लग्नाची मंगलाष्टके म्हणण्यात चढाओढ लागत असे. एक मंगलाष्टक संपले कि दुसरे मंगलाष्टक म्हणण्याची संधी साधण्यासाठी उपस्थितांकडून धडपड केली जात असे. हल्ली काही विवाह सोहळ्यांना तर केवळ मंगलाष्टके म्हणण्यासाठी वाद्यवृंद आणि गायक बोलावले जातात. त्यासाठी वेगळा खर्च केला जातो. . वधूवरांनी एकमेकांना पुष्पहार घालून झाल्यावर त्यांच्या मस्तकावर अक्षता वाहण्याची पद्धत आहे; मात्र अनेक जणांना याविषयी पुरेशी माहिती नसल्याने मंगलाष्टके म्हणतानाच अक्षता उधळल्या जातात. परिणामी अक्षता वधू वरांच्या मस्तकावर न पडता कार्यक्रमस्थळी सर्वत्र विखुरल्या जातात. अशा ठिकाणी वावरताना त्या पायाखाली येतात. यामध्ये अक्षतांची नासाडीही होते आणि अवमानही होतो. वधू-वरांनी एकमेकांना पुष्पहार घालणे हा विवाहातील एक महत्वाचा क्षण असतो. त्यालाही मनोरंजक करण्यासाठी हल्ली वधू-वरांना उगाचच उंचावर उचलून सहजपणे हार न घालू न देण्यासाठी आटापिटा केला जातो. ज्यामुळे त्यातील धार्मिकता निघून जाऊन तो केवळ मनोरंजनाचा क्षण बनतो. स्वागत समारंभासाठी परिधान करण्यात येणारे हिंदू वधु-वरांचे कपडेही हल्ली पाश्चात्य पद्धतीने शिवण्याची प्रथा पडू लागली आहे. त्यामुळे सकृतदर्शनी विवाह ख्रिश्चनांचा आहे कि हिंदूंचा हा उपस्थितांनाही प्रश्न पडतो. हल्ली विवाह विधी पार पडल्यानंतर सर्वांना एकत्र गोळा करून त्यांच्या समक्ष वधु-वरांकडून महागडा केक कापला जातो. हिंदू धर्मात शिजलेल्या अन्नपदार्थांवर सूरी फिरवणे वर्ज्य मानले जाते. त्यामुळे विवाहासारख्या सात्विक कार्यक्रमामध्ये अशी असात्त्विक कृती करणे अयोग्यच म्हणावे लागेल. हल्ली लग्नाच्या सिद्धतेसाठी अधिक वेळ द्यायला नको म्हणून इव्हेन्ट मॅनेजमेंट कंपनीला लाखो रुपये देऊन कंत्राट दिले जाते. ही कंपनी विवाहातील धार्मिक विधींना अधिक महत्व न देता सोहळा अधिकाधिक मनोरंजक आणि आकर्षक कसा होईल याकडे अधिक लक्ष देतात. त्यामुळे अनेक ठिकाणी धार्मिक विधी चालू असताना दुसरीकडे सिनेसंगीत चालू असते. त्यामुळे उपस्थितांचे अधिक लक्ष त्याकडेच जाते. विवाह विधी सुरु असताना जी शांतता अपेक्षित असते ती न पाळता सर्वत्र गोंगाटाचे वातावरण असते. आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी याच कंपन्यांकडून वधु-वरांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे सिनेगीतांवर नृत्य बसवले जातात, विवाह विधीनंतर त्याचे विशेष सादरीकरण असते. स्टेजवर लोकांसमोर नाचायचे आहे, तर सर्व व्यवस्थितच व्हायला हवे यासाठी अनेक जवळचे नातेवाईक लग्नाच्या तयारीत हातभार लावण्यापेक्षा या नृत्याच्या तयारीतच अधिक व्यस्त असतात. विवाह विधी हा वर आणि वधु या दोहोंच्या नातेवाईकांसाठी आनंदाचा विधी असतो, त्यामुळे विवाहाप्रित्यर्थ उपस्थितांना प्रीती भोजन दिले जाते. हे भोजन वधु वरांच्या कुटुंबाच्या ऐपतीनुसार दिले जायला हवे; मात्र इथेही आत्मप्रौढीसाठी भोजनात नको तितक्या पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. काही ठिकाणी भोजनासाठी शाकाहार आणि मांसाहार असे वेगवेगळे कक्ष उभारले जातात. याशिवाय चायनीज, इटालियन पदार्थांचे कक्ष उभारण्याचीही पद्धत हल्ली रूढ होत चालली आहे. शहरी भागांत भोजनासाठी सर्रास 'बुफे' पद्धत अवलंबली जाते, ज्यामध्ये आपले ताट स्वतःहून वाढून घ्यायचे असते. बऱ्याचदा उपस्थित मंडळी आपल्या भुकेचा अंदाज न घेता केवळ समोर ठेवले आहेत म्हणून नको तितके पदार्थ ताटात वाढून घेतात आणि संपवता न आल्याने त्यातील काही पदार्थ ताटातच अर्धवट खाऊन सोडून देतात. दरवर्षी लगीन सराईमध्ये असे कितीतरी टन अन्न केवळ ताटात अर्धवट सोडून दिल्यामुळे वाया जाते. आज भारतात असाही वर्ग आहे ज्यांना प्रतिदिन २ वेळचे पोटभर अन्न मिळणे दुरापास्त आहे. अशा भारतात जेवण ताटात सोडून वाया घालवणे म्हणजे अन्नदेवतेचा अवमान नव्हे का ? अशा प्रसंगी भोजनाकरीता भारतीय पंगत अधिक योग्य ठरते; मात्र तिलाच आज 'आऊटडेटेड' ठरवण्यात आले आहे. विवाहानंतर मंजुळ आवाजाच्या पारंपरिक वाद्यांनीशी वधु -वरांची वरात काढण्याची प्रथा लोप पावत चालली आहे. हल्ली वरातीसाठी डीजे, बेण्डबाजा आणि कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीसाठी हजारो रुपये उधळले जातात. याशिवाय मित्र मंडळींना मद्याच्या आणि मांसाहाराच्या मेजवान्या देण्यासाठी खर्च होतो तो वेगळाच. विवाह सोहळा म्हणजे खरेतर वधु-वरांचा उत्सव, मात्र त्यातही हल्ली नातेवाईकांचे मानापमान नाट्य पाहायला मिळते. वर किंवा वधूच्या आईवडिलांनी मनासारखे कपडे किंवा दागिने घेतले नाहीत, पत्रिकेत नाव टाकले नाही म्हणून ऐन लग्नातही नातेवाईकांचे रुसवे फुगवे सुरु असतात. यांचा मान राखण्यासाठी पुन्हा वेगळा खर्च केला जातो. लग्न सोहळ्यासाठी खरेतर आपल्या ऐपतीप्रमाणेच खर्च केला जावा; मात्र 'लोकांना काय वाटेल' या विचाराने वर-वधूच्या कुटुंबियांकडून लग्न सोहळा दिमाखात पार पडावा यासाठी कर्ज काढून नको त्या गोष्टीसाठी नको तेव्हढा खर्च केला जातो. त्यामुळे विवाह संस्कारातील धार्मिक विधी राहतात बाजूला आणि अनावश्यक बाबींसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो. लग्नानंतर गृहस्थाश्रम आरंभ होतो. नवा संसार उभा करण्यासाठी जागोजागी धनाची निकड भासते; मात्र वधु-वरांची सुरुवातीची काही वर्षे लग्नासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते फेडण्यातच व्यय होतात. विवाह संस्कारामध्ये केवळ धार्मिक विधींना महत्व असून आपल्या इभ्रतीखातीर त्याला लावण्यात आलेल्या उपरोक्त बाबींचा मुलामा निव्वळ दिखाव्यासाठी असतो. पूर्वी अनोळखी व्यक्तींसोबत विवाह संस्कार करून केलेले विवाहही पुढे आयुष्यभर टिकून राहात असत, त्यामुळे घटस्फोट नावाचा प्रकार त्यावेळी अस्तित्वातच नव्हता. 'घटस्फोट' हा शब्दही केवळ पती पत्नीमधील नाते संपवण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणारा शब्द आहे त्यामुळे हिंदू धर्मशास्त्रात या किंवा अशा अर्थाच्या कोणत्याच शब्दाचा उल्लेख नाही. हल्ली घटस्फोटांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यामागे अनेक कारणे असली तरी विवाह संस्कारांना दिले जाणारे दुय्यम महत्व याचाही इथे उल्लेख करावासा वाटतो. लोकांना, नातेवाईकांना काय वाटेल या विचाराने आपण कर्जबाजारी होऊन लग्न सोहळे साजरे करत असू तर हेच लोक नंतरही आपल्याला नावे ठेवणारच आहेत हे लक्षात घ्यायला हवे. विवाह संस्कारांत शिरलेल्या अनिष्ट प्रथांचे समूळ उच्चाटन झाले कि त्यासाठी केला जाणारा अवास्तव खर्चही वाचेल. यासाठी सर्वांनीच पुढाकार घेऊन विवाह संस्कारात परंपरागत विधींना प्राधान्य द्यायला हवे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## लक्ष्मण रेखा..

अनुभव दे निवडणूका
धडा निमीत्ताने शिका
जनसेवेच्याआनंदापुढे
विजयाचा पेढा फिका

करत असताना टिका
रे आखा लक्ष्मण रेखा
मोकळेपणे स्विकारा
पदरातपडलेले जे का


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


जाणीव दिली जनतेने
कर्तव्या सोबत हक्का
अभिनंदन हो जेत्यांचे
कपाळे लावावा टिका

विजयश्री मिळे जेंव्हा
मन मयूर करतो केका
मलाचं मिळावी सत्ता
कधी तरी सोडा हेका

आपले कुटुंबात सत्ता
सोडायचा हेकट ठेका
उचित उमेदवारां कधी
नक्कीचं मिळो मोका

दुज्यांच्या सुखातसुख
आनंदनसे या सारखा
दुज्यांच्या दुःखा दुःख
आपला होणारं परका

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२


# थोडक्यात

## लातूर ग्रामीण मतदार संघात .आ.रमेश कराड यांच्या विजयाचा जल्लोष



**अक्षराज : उमेश जोशी**
**दि.२५, रेणापूर :** विधानपरिषदेचे आमदार असतानाही थेट जनतेतून निवडून येण्याची इच्छा व्यक्त केल्याने भाजपाचे रमेश कराड यांना तिकीट देऊन ग्रामीण मतदार मोठी ठस्सल देऊन विद्यमान आम दार धिरज देशमुख यांच्या विरोधात दंड थोपटले व रमेश कराड यांनी ६ हजार ५९५ मताधिक्य घेऊन विद्यमान आमदार धिरज देशमुख यांचा पराभव करुन कराड विजय झाले. रमेश कराड हे सुरुवाती पासून ते पहील्या फेरी पासून कमी मताने का आसेना त्यांची सतत आघाडी राहीली. त्यांनी विद्यमान आमदार धिरज देशमुख यांचा पराभव करुन एक नवा इतिहास घडवला. धिरज देशमुख हे २०१९ मध्ये नोटाच्या विरोधात १ लाख ७ हजार ५०६ एवढ्या मताने विजयी झाले होते. २०१९ मध्ये रमेश कराड यांना उमेदवारी न देता ही जागा शिवसेनेला सोडली होती. शिवसेना उमेदवार यांनी उमेदवारी दाखल करुन ते मतदार संघाबाहेर बसले होते. २०२४ च्या निवडणुकीत मोठी ठस्सल देऊन रमेश कराड यांना १लाख १२ हजार ५१ मते घेऊन हे ६ हजार ५९५ मताने विजयी झाल्याने लातूर ग्रामीण मतदार संघात मोठ्या जल्लोषात विजय उत्सव साजरा करण्यात आला.

## प्रभा सोलंकी यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार



**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.२५, मुंबई :** मारवाडी विद्यालय हायस्कूल येथील सेवा निवृत्त शिक्षिका प्रभा सोलंकी यांना नुकताच जॉय संस्थेच्या वतीने आदर्श शिक्षिका पुरस्कार घोषित करण्यात आला असून येत्या फेब्रुवारी महिन्यात जॉय वर्धापन दिनी तो त्यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार असल्याचे संस्थापक गणेश हिरवे यांनी कळविले आहे. सोलंकी या १९८२ साली शाळेत इंग्लिश इतिहास या विषयाच्या शिक्षिका म्हणून कामाला लागल्या. ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्या २०२० मध्ये सेवा निवृत्त झाल्या. त्यांच्या हाताखालुन शिकलेले विद्यार्थी अज विविध ठिकाणी चांगल्या पदावर कार्यरत आहेत. एक कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय आणि उपक्रमशील शिक्षिका म्हणून प्रभा सोलंकी यांना लोक ओळखतात.सामाजिक कार्यात देखील त्या नेहमीच पुढाकार घेऊन अनेकजणांना सहकार्य करीत असतात. त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याने अनेकांनी आनंद व्यक्त करीत त्यांचे अभिनंदन केलं आहे.

## संजय बनसोडे यांच्या विजयाचा गुडसुर गावात मोठा जल्लोष



**अक्षराज : जयराम देमगुंडे**
**दि.२५, उदगीर (लातुर) :** उदगीर - जळकोट विधानसभा निवडणुकीत महायुती राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे विधमान आमदार, क्रीडामंत्री संजय बनसोडे यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला असुन गुडसुर गावातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अ.प.) गटाचे उपसरपंच बालाजी देमगुंडे, माधव मलकनपटे, रोप थोडगे, लक्ष्मण सुर्यवंशी, संजीव गोतावळे, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते शैलेश देमगुंडे, कालीदास दर्डीमे, सामाजिक कार्यकर्ते किरण सुर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य अविनाश मरलापल्ले, चमन मीस्त्री, पपु माळी, कपील माळी, आसलम पठाण, हरी मोरे, पंढरी सुर्यवंशी यांनी छत्रपती संभाजी महाराज चौक बालाजी मंदिर ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणाच्या समोर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मुख्य मेन रोड रस्ता, व्यापारी बाजारपेठे समोर फटाक्यांची आतषबाजी करत गुलालाची उधळण केली. विजयाचा पेढे वाटून आनंद उत्सव साजरा केला. या विजयामुळे पुन्हा एकदा गुडसुर परिसरा मध्ये महायुती, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना, भाजपचा झेंडा फडकला आहे. महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शप), उबाठा शिवसेना पक्ष, राष्ट्रीय काँग्रेसचे पक्षांचे उमेदवार, दहा वर्ष भाजपाचे आमदार असलेले माजी आमदार सुधाकर भालेराव यांचा मोठ्या मताधिक्याने दारुण पराभव केला. असून याच आनंदात गुडसुर गावातील अ.प.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे, शिवसेना शिंदे गटाचे, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने यांची उपस्थित होती.

## विठ्ठल कारखाना कार्यस्थळावर कर्मवीर औदुंबर पाटील यांची जयंती



**अक्षराज : विकास सरवळे**
**दि.२५, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील वेणुनगर-गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे संस्थापक चेअरमन कर्मवीर कै. औदुंबरावजी (आण्णा) पाटील यांची १०१ वी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी कारखाना कार्यस्थळावरील कर्मवीर कै.औदुंबरावजी (आण्णा) पाटील यांचे पुर्णाकृती पुतळ्याची विधीपूर्वक पुजा कारखान्याचे चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रेमलता रोंगे, तसेच संचालक सर्वश्री सुरेश भुसे, सचिन वाघाटे, प्रविण कोळेकर, विठ्ठल रणदिवे, तज्ञ संचालक दशरथ जाधव, अंगद चिखलकर, समाधान गाजरे, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड, विठ्ठल प्रशालेचा सर्व स्टाफ तसेच कारखान्याचे सभासद, कार्यकर्ते, ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्व संचालक व मान्यवरांनी याप्रसंगी कर्मवीर औदुंबरावजी (आण्णा) पाटील यांना आदरांजली वाहिली.

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने 'छ.शिवाजी महाराज आणि स्वराज्य' विषयावर व्याख्यान



**अक्षराज : स्वामी दळवी**
**दि.२५, खडकवासला (पुणे) :** छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मनिरपेक्ष होते, असे दाखविण्याचा प्रयत्न हल्ली होत आहे. सर्वधर्म समभाव हे होऊच शकत नाही, कारण सर्व धर्मांची तत्वे आणि पाया वेगळा आहे. पुढची पिढी सुरक्षित ठेवायची असेल तर हिंदवी स्वराज्य हा शब्द विसरता कामा नये. शिवाजी महाराजांनी उभे केले ते हिंदवी स्वराज्य आहे. आपल्याकडे जो इतिहास शिकवला जातो तो अत्यंत चुकीचा शिकवला जातो. कारण स्वातंत्र्यानंतर इंडियन हिस्टरी काँग्रेस ही स्वच्छ शब्दात डाव्या विचारसरणीच्या लोकांकडे दिली गेली, त्यांना तुम्ही लिहाल तो इतिहास असे सांगितले गेले आणि तोच इतिहास आपल्याला शिकवला गेला, असे मत व्याख्याते राहुल सोलापूरकर यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने नऱ्हे येथील शैक्षणिक संकुलात व्याख्याते राहुल सोलापूरकर यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते.

राहुल सोलापूरकर म्हणाले, छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे निती नियम पक्के घातले होते. राजा असो किंवा नसो आपण एकनिष्ठ राहून काम करायचे हे सगळ्यांनी पाळले. आपल्यासाठीही घटनेचे नियम दिलेले आहेत.

त्यातल्या नियमाच्या विरोधात वागणे हा देशद्रोह मानला पाहिजे. ते पुढे म्हणाले, लव्ह जिहाद, लँड जिहाद, व्होट जिहाद यांना आपण गंभीरतेने घेऊन सावध रहायला हवे. धर्म टिकला तर संस्कृती टिकते असे शिवाजी महाराज म्हणायचे. शिवाजी महाराजांचे आपण विचारांनी मावळे व्हायला पाहिजे. प्रत्येकवेळी तलवारच हातात घ्यायला पाहिजे असे नाही. धर्म महत्त्वाचा आहे. आपला धर्म आपण विसरत चाललोय, असेही त्यांनी सांगितले.

## निवडणुकीतील आश्वासनांच्या पावसात बळीराजा कोरडाच !

**अक्षराज : कैलास राठोड**
**दि.२५, किनवट (नांदेड) :** विधानसभा निवडणुकीत मतदार डोळा ठेवून राज्यकर्त्यांनी हा असं आश्वासनांच्या घोषणांचा अक्षरश पाऊस पडला. कर्जमाफी करण्यात येईल असे आश्वासन दोन्ही पक्षांच्या घोषणा पत्रात देण्यात आले. परंतु प्रत्यक्ष प्रचारात कर्जमाफीचा मुद्दा तापलाच नाही. सध्याची भीषण पीक परिस्थिती पाहता. निवडणुकीत आश्वासनाच्या पावसात बळीराजा मात्र कोरडाच असल्याचे चित्र पाहायला मिळाले. महायुती सरकार सत्तेत आल्यामुळे ही आश्वासने पूर्ण होतात की हवेत विरतात याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. शेतकरी युवक अस्वस्थ दिसून येत असतानाच मतदानाची प्रक्रिया पार पडली सुरुवातीला सततचा पाऊस व नंतर परतीच्या पावसाने पिकांची दाणादाण उडाली होती. यामुळे हातात व तोंडाशी आलेला घास हिरावला गेला त्यानंतर पीक काढणीच्या वेळी शेतमजुरांचा प्रचंड प्रमाणात तुटवडा निर्माण झाला.

काही मुले मुले शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत एक तर जागा रिक्त असतानाही त्या भरल्या जात नाहीत स्पर्धा परीक्षा च्या निकाल वर्षानुवर्ष जाहीर केला जात नाही. यात निवड झालेल्या मुलांना वेळेत नियुक्तयासुद्धा मिळत नाहीत. अशा प्रकारे गाव खेड्यातील युवकांची अडवणूक केली जात आहे. त्यातच यावर्षीच्या संबंधित पिक विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या टाळू वरील लोणी खात आहेत. मग ही गाजा वाजा केलेली पंतप्रधान पिक विमा योजना कोणासाठी आहे. हा कष्टकरी शेतकऱ्यांना पडलेला प्रश्न आहे.

स्थानिक मजुराकडून शेतकऱ्यांनी अधिकची मजुरी देऊन सोयाबीन काढले केंद्र सरकारने सोयाबीनला प्रति क्विंटल ४ ८५० रुपये हमीभाव जाहीर केला आहे. मात्र बाजारात ४००० इतक्या कमी भावातच सोयाबीन विकावे लागले जास्तीच्या पावसाने सोयाबीन शेंग परिपक्व झाली नाही.

दिवसेंदिवस खतांचे भाव सारखे वाढतच आहेत इतरही खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे कापसाची सुद्धा अशीच भयानक परिस्थिती आहे लोकसभा निवडणुकीच्या प्रचार सभेत शेतमालाला खर्चाच्या ५०% आधारावर भाव देण्याचे आश्वासन दिले होते. ते आश्वासन हवेतच विरून गेले त्यातच विधानसभेलाही आश्वासने देण्यात आली आहेत. परंतु ही आश्वासने पूर्ण होतात की परत हवेत विरून जातात हे येणारा काळच सांगणार आहे.

## पहिल्या कसोटीत भारताचा दमदार विजय; ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी पराभव



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२५, पर्थ :** भारताने पर्थमधील पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा २९५ धावांनी दणदणीत पराभव करत ऐतिहासिक विजय नोंदवला. ५३४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव केवळ २३८ धावांवर आटोपला. या विजयासह भारतीय संघाने कसोटी मालिकेत २-० अशी आघाडी घेतली असून दुसरा सामना ६ डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये खेळवला जाईल. भारतीय संघाचा हा विजय ऑस्ट्रेलियाच्या भूमिवर सर्वात मोठ्या अंतराने मिळवलेला ऐतिहासिक विजय ठरला आहे. पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर भारताने प्रथमच विजय मिळवला असून, ऑस्ट्रेलियाला या मैदानावरचा पहिलाच पराभव स्वीकारावा लागला आहे. याआधी या मैदानावर ऑस्ट्रेलियाने खेळलेल्या चारही सामन्यात विजय मिळवला होता. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव कोसळला विजयासाठी ५३४ धावांच्या पाठलागात ऑस्ट्रेलियाची सुरुवात अत्यंत खराब झाली. पदार्पण करणाऱ्या नॅथन मॅकस्विनीला जसप्रीत बुमराहने शून्यावर बाद केले. त्यानंतर मोहम्मद सिराजने नाईटवॉचमन पॅट कमिन्सला (२) तंबूत पाठवले. तिसऱ्या दिवसाअखेर १२/३ अशा अडचणीत असलेल्या ऑस्ट्रेलियाला चौथ्या दिवशी सिराजनं उस्मान ख्वाजाला (४) बाद करून आणखी अडचणीत टाकले. स्टीव्ह स्मिथ (१७) आणि ट्रॅव्हिस हेड (८९) यांनी चौथ्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी केली. मात्र, स्मिथला सिराजनं रिषभ पंतकडे झेलबाद केले. त्यानंतर जसप्रीत बुमराहने हेडची महत्त्वाची विकेट घेत ऑस्ट्रेलियाचा डाव खिळखिळा केला. मिचेल मार्श (४७) आणि मिचेल स्टार्क (१२) यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश रेड्डीच्या गोलंदाजीने ऑस्ट्रेलियाचा डाव लवकरच आटोपला. शेवटच्या फलंदाज ॲलेक्स कॅरीला (३६) हर्षित राणानं बोल्ड केलं. गोलंदाजांची चमकदार कामगिरी भारतासाठी जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराजनं प्रत्येकी ३ बळी घेतले. वॉशिंग्टन सुंदरने २ विकेट घेतल्या, तर नितीश रेड्डी आणि हर्षित राणाला प्रत्येकी १ विकेट मिळाली. भारतीय गोलंदाजांच्या अचूक माऱ्यामुळे ऑस्ट्रेलियाचा डाव पुरता कोसळला. या विजयाने भारतीय संघाने केवळ मालिकेत आघाडी घेतली नाही, तर ऑस्ट्रेलियाच्या भूमीवरील त्यांच्या वर्चस्वाला जोरदार धक्का दिला आहे.

## व्यवसाय परवाना नुतनीकरणाबाबत जाहीर आवाहन...

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.२५, नवी मुंबई :** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७६, अनुसूची ड, प्रकरण १८, भाग ४ मध्ये समाविष्ट असलेले सर्व व्यवसाय (उदा. खानावळी, हॉटेल, उपहारगृहे, लॉजिंग बोर्डीग, स्वीट मार्ट, केक शॉप, आईस्क्रिम पार्लर, केश कर्तनालये, ब्युटी पार्लर इ.) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३७६ अन्वये देण्यात आलेल्या व्यवसाय परवान्यांचे नुतनीकरण दरवर्षी करण्यात येते.

नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना / व्यावसायिकांना परवाना देण्याची व त्यांचे नुतनीकरण करण्याची प्रक्रिया पारदर्शी व सुलभ करण्याकरिता ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. ज्या व्यावसायिकांनी नवी मुंबई महानगर पालिकेकडून कलम ३७६ अन्वये व्यवसाय परवाना घेतलेला आहे आणि ज्या व्यावसायिकांनी घेतलेल्या व्यवसाय परवान्याची कालमर्यादा संपुष्टात आलेली आहे, अशा सर्व व्यावसायिकांनी व्यवसाय परवाना नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

व्यवसाय परवाना नुतनीकरण २०२५ साठी संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह www.rtsnmmconline.com किंवा नमुंमपाचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in वरील सुविधेचा वापर करून ऑनलाईन अर्ज दिनांक ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी स्वतः सादर करावेत. विहित कालमर्यादित परवान्याचे नुतनीकरण केले नाही तर परवाना धारकावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३९२,४६८ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

व्यवसाय परवाना नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियमाचे कलम ३७६ अनुसार ऑनलाईन पध्दतीने परवाना नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येईल. दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी व्यावसायिकांनी त्वरीत परवाना नुतनीकरण करुन घ्यावे, असे नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

## जिद्द, सातत्य आणि कष्टाळू आई-बाबा, शिक्षकांमुळे देशसेवेत- वैष्णवी पवार



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**
**दि.२५, खंडाळा (सातारा) :** सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय,२०२३ मधील रसायनशास्त्र पदवीधर विद्यार्थीनी वैष्णवी चंद्रसेन पवार हीने केंद्र सरकारच्या कर्मचारी निवड आयोगाने परीक्षा फेब्रुवारी-२०२३ व अंतिम निकाल ऑगस्ट २०२३ मध्ये जीडी-कॉन्स्टेबल सीमा सुरक्षा बल पदाला गवसणी घातली. लेखी परीक्षा शारीरिक परीक्षा व वैद्यकीय चाचणीत पात्र होऊन ०१ जानेवारी २०२४ ते १६ नोव्हेंबर २०२४ अखेर वैष्णवीने खरका,पंजाब येथे खडतर प्रशिक्षण पूर्ण केले आणि तीला पश्चिम बंगाल येथे नियुक्ती मिळाली आहे. वैष्णवीचे प्राथमिक शिक्षण शिवाजीनगर(ता. खंडाळा) येथे झाले असून उच्च माध्यमिक शिक्षण राजेंद्र विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय खंडाळा येथे झाले.या दिमाखदार यशाबद्दल महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभाग वतीने प्राचार्य डॉ.हणमंत जाधव यांच्या शुभहस्ते श्रीफळ, गुच्छ व शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला. वैष्णवी आपल्या मनोगतात म्हणाली-वडिलांचा केशकर्तन व्यवसाय व शेती व गृहिणी असणारी आई यांनी मला वेळोवेळी पाठबळ दिले. यासोबत महाविद्यालय सर्व प्राध्यापक यांचा वाटा असून, सातत्यपूर्ण अभ्यास,जिद्द आणि चिकाटीतून मिळालेले पहिल्या प्रयत्नात मला यश मिळाले.

